

शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

ई-मेल : fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ : www.mahafra.org
संपर्क : ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या ५४ व्या बैठकीचे इतिवृत्त

दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२६

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११(२)(३)(४) या मजकुराऐवजी सुधारणा अधिनियम, २०२६ अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची ५४ व्या बैठक श्री. शेखर माधूरी मनोहर चन्ने, भा.प्र.से, (से.नि),अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :

१	मा.श्री. शेखर माधूरी मनोहर चन्ने, भा.प्र.से, सेवानिवृत्त सचिव, अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
२	डॉ. मुरलीधर मुक्ताबाई गोविंदराव चांदेकर, माजी कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित
३	श्री.नितीन बापुराव चव्हाण सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
४	श्री. श्रीकांत निर्मल मोहन लिमये सनदी लेखापाल सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
५	श्री.अतुल दामोदर धारप परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
६	श्री. अश्विन मधुसूदन सोलंकी परिव्यय लेखापाल, सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	उपस्थित
७	डॉ. दत्तात्रय वेनुबाई व्यंकटराव जाधव, व्यावसायिक शिक्षण तज्ज्ञ सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित
८	संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण	अनुपस्थित

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

Ashoka Center for Business and Computer Studies ★ Nashik ★ PU/NS/CS/ 143/2009

PRINCIPAL
Ashoka Center for Business and Computer Studies, Nashik

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१४६/२०२६	कांदिवली एज्युकेशन सोसायटी संचलित, बी. के. श्रॉफ कॉलेज ऑफ आर्ट्स आणि एम. एच. श्रॉफ कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई Code No. BBA03651	B.B.A	64,500/-
		B.C.A	65,500/-
		B.M.S	49,500/-

vii) अशोका सेंटर फॉर बिझनेस अँड कॉम्प्युटर स्टडीज, नाशिक(BBA05601) यांनी B.B.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १४८/२०२६.**
"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. हर्षा के. पाटील – संस्थेचे प्रभारी प्राचार्य
२. श्री. शिंपी शशिकांत गोपाळराव – संस्थेचे उपकुलसचिव
३. श्रीमती. स्वप्नजा प्रभुणे – संस्थेचे वरिष्ठ व्यवस्थापक
४. श्री. सचिन जाळणेकर – संस्थेचे लेखा अधिकारी

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला की, कॉम्प्युटेशन शीटमध्ये (Computation Sheet) काही खर्चाच्या बाबी अमान्य करण्यात आलेल्या असून, सदर खर्चाच्या बाबी मान्य करण्यात याव्यात, अशी विनंती करण्यात आली.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

संस्थेची सदर विनंती विचारात घेतली असता, तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकांच्या वेतनाची गणना कमी प्रमाणात करण्यात आल्याचे निदर्शनास आले. ही बाब विचारात घेऊन शिक्षकांच्या वेतनाच्या रकमेमध्ये रुपये १८,१७,२३२/- इतकी वाढ करण्यात आली. तथापि, प्रत्यक्ष गणनेनुसार रुपये १,११,२१,१३८/- इतकी रक्कम मान्य करण्याबाबत विचार करण्यात आला.

तसेच, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत रु. १५,१२,०००/- इतकी वाढ विचारात घेऊन सदर रक्कम रु. १९,७६,६५९/- इतकी निश्चित करण्यात आली. त्यानंतर सर्व बाबींची संपूर्ण पडताळणी व पुनर्गणना केल्यानंतर संस्थेने केलेले निवेदन विचारात घेऊन **पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मान्य** करण्यात येत असून, शुल्क **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत** आहे:-

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027 Per Student (Rs.)
१४८/२०२६	अशोका सेंटर फॉर बिझनेस अँड कॉम्प्युटर स्टडीज, नाशिक Code No. BBA05601	BBA	48,000/-

Ashoka Center for Business and Computer Studies, Nashik
PU/NS/CS/143/2009
PRINCIPAL
Ashoka Center for Business and Computer Studies, Nashik